संदर्भ :- १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६(२) अन्वये.

२. मा. मंत्री जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) आपत्ती व्यावस्थापन महाराष्ट्रराज्य यांचे कडील जाक्र.मंत्री/जलसंपदा (वि.ता.को.) आ.व्या/नोट/७२९/२०२५रोजीचे पत्र.

२. परिपत्रक जाक्र. जापवि. कक्ष-१/४३२/२०२०. दि.०७/०७/२०२०

---

नाशिक महानगरपालिका, नाशिक
जाक्र. जापवि/कक्ष-१/२८३/२०२५
दिनांक : २८ / ८ २०२५

आदेश : २७

विषय :- आगामी सार्वजनिक गणेश उत्सव २०२५ करीता,मनपा जागेत तात्पुरता स्वरुपात उभारणी करण्यात येणाऱ्या मंडप/स्टेज करीता आकारण्यात येणारे शुल्क माफ करणे बाबत.

वरील विषयांन्वये व संदर्भिय पत्रानुसार आगामी सार्वजनिक गणेशउत्सवा निमित्त सार्वजनिक मंडळाकरीता आकारले जाणारे मंडप शुल्क आकारण्यात येऊ नये याबाबत संदर्भ क्रमांक २ मा. मंत्री जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) आपत्ती व्यावस्थापन महाराष्ट्रराज्य यांचे कडील जाक्र.मंत्री/जलसंपदा (वि.ता.को.) आ.व्या/नोट/७२९/२०२५ अन्वये गणेशोत्सव मंडळंकडुन महानगरपालिके मार्फत विविध शुल्क आकारण्यात येत असते याबाबत विविध लोकप्रतिनिधी यांचेकडुन प्राप्त झालेल्या विनंतीच्या अनुषंगाने यावर्षी होणाऱ्या गणेशोत्सव उत्सवा करीता मंडळांकडुन कोणत्याही प्रकारचे शुल्क महनगरपालिकेकडून आकारण्यात न येणे बाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

नाशिक महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ (१) अन्वये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८९६, दि.०१/११/१९९९ नुसार रस्त्यावर तात्पुरता स्वरुपात मंडप/स्टेज, उभारणी करीता दररोज र.रु. ६/- प्रति चौ.मि. व कमीत कमी र.रु. ७५/- दराप्रमाणे शुल्क आकारण्यात येते. त्याअन्वये, नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव करीता (कलम २३४ नुसार) एकूण १० दिवसांकरीता नाममात्र र.रु. ७५०/- व त्यावरील वस्तू व सेवाकर १८ टक्के याप्रमाणे शुल्क आकारणी करून विभागीय कार्यालयामार्फत परवानगी देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येते. मात्र मनपा मालकीच्या जागें व्यतिरिक्त खाजगी जागांमध्ये मंडप/स्टेज उभारणी केले असल्यास, त्यावर शुल्क आकारणी करण्यात येत नाही. परंतु, इतर अनुषंगिक नियमाप्रमाणे परवानगी प्राप्त करणे अनिवार्य आहे.

यापुर्वी सन २०२४ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाकरीता सार्वजनिक गणेशोत्सव- २०२४ करीता मा. पालकमंत्री महोदय नाशिक,व लोकप्रतिधिंच्या मागणीचा विचार करून नाशिक महानगरपालिकेच्या जागांवर, रस्त्यावर, मंडप/स्टेज करीता आकारण्यात येणारे नाममात्र सन २०२४ करीता मा. महासभा ठराव क्र.३५५ दि. ०६/०९/२०२४ व मा. आयुक्त सो.आदेश क्र.३८ दि.०४/०९/२०२४ अन्वये सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त मंडप उभारणी करीता आकारण्यात येणारे नाममात्र् शुल्क माफ करण्यात आलेले होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ (२) या अधिनियमान्वये किवा तद्‌नंतर अन्यथा तरतुद करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त अशा प्रत्येक लायसेन्ससाठी किवा लेखी परवानगीसाठी, आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा दराने फी आकारता येईल, याप्रमाणे तरतुद आहे.

सबब आगामी सार्वजनिक गणेशउत्सव २०२५ करीता, नाशिक महानगरपालिकेच्या जागांवर/रस्त्यावर, मंडप/स्टेज करीता आकारण्यात येणारे शुल्क र.रु.७५०/- अधिक वस्तु व सेवाकर इत्यादी निःशुल्क करणेस व तसेच ज्या मंडळांनी मंडप आकारणी शुल्क भरलेले आहेत त्यांना त्यांच्या अर्जान्वये रितसर परवानगी घेऊन भरलेले शुल्क परत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा आदेश मनपाच्या संकेत स्थाळावर प्रसिध्द करुन गणेश मंडळांना अवगत करावा. प्रस्तावित आदेश सार्वजनीक गणेशोत्सव २०२५ करीता लागु राहिल.

**(मनिषा खत्री (भा.प्र.से.))**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

**प्रत माहिस्तव सादर :-**

१. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा. पोलिस आयुक्त, नाशिक शहर
३. अति. आयुक्त (१) मनपा,नाशिक.
४. अति. आयुक्त (शहर) मनपा,नाशिक.
५. अति. आयुक्त (सेवा) मनपा,नाशिक.
६. शहर अभियंता, मनपा, नाशिक.

**प्रत कार्यवाहीस्तव सादर :-**

१.उप आयुक्त, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा, नाशिक.
२.मा.मुख्यलेखा व वित्त अधिकारी, मनपा, नाशिक.
३.मुख्य अग्निशमन अधिकारी, मनपा नाशिक.
४.कार्यकारी अभियंता, विद्युत, मनपा नाशिक.
५.सर्व विभागीय अधिकारी, मनपा, नाशिक.